
Website : www.keshavsmrutipatpedhi.com
Email : keshav_ho@rediffmail.com

# ३६ वा
## वार्षिक अहवाल
## सन २०२३-२०२४





ROHS IAF eiaci CB-QMS-035
ISO 9001:2015

# केशवस्मृति
## नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

केशवस्मृति
नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

# ॥ सन्माननीय संचालक मंडळ ॥



**श्री.अमित ओझे**
अध्यक्ष



**सौ.ज्योती कानिटकर**
उपाध्यक्षा



**ॲड.श्री.प्रफुल्ल म्हात्रे**
संचालक



**श्री.मकरंद बापट**
संचालक



**श्री.अविनाश कोळी**
संचालक



**श्री.सुबोध भिडे**
संचालक



**श्री.माणिक देवकांबळे**
संचालक



**सौ.संगीता परदेशी**
संचालिका



**श्री.अशोक नाईक**
संचालक



**श्री.प्रतिक बहिरा**
संचालक



**सौ.अंजली सिधये**
संचालिका

**३६ वा वार्षिक अहवाल (सन २०२३-२४)**

## केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. ६ जुलै, २०२४ रोजी सायं ६.०० वाजता, जेष्ठ नागरीक सभागृह, ठाणा नाका रोड, पनवेल** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेकरीता आयोजित केली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) संस्थेच्या दि. ०१/०७/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रकास मान्यता देणे आणि कायदा व नियम यांस अनुसरुन नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे. सन २०२४-२०२५ वर्षाकरीता केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व २०२३-२०२४ सालच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे व मान्यता देणे.

३) सन २०२३ ते २०२४ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा विचार करणे, स्विकारणे तसेच मान्यता देणे. सन २०२२-२०२३ वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे.

४) सन २०२४-२०२५ या वर्षासाठी अंतर्गत हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे.

५) सन २०२४-२०२५ या वर्षासाठी निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे.

६) नियम ४९ नुसार कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.

७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : २२ जून २०२४

**सौ. ज्योती कानिटकर**
उपाध्यक्षा

### विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास हिच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरविली जाईल.

२) संस्थेचे आर्थिक हिशेब अथवा अन्य बाबतीत माहिती अथवा स्पष्टीकरण हवे असल्यास दि.२८/०६/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी विचारणा करावी.

३) ज्या सभासदांना काही प्रस्ताव अथवा सूचना मांडावयाच्या आहेत त्यांनी त्या दि. २८/०६/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा पाठवाव्यात व सभेला स्वत: उपस्थित रहावे.

**सौ. ज्योती कानिटकर**
उपाध्यक्षा

# संचालक मंडळाचा अहवाल

**आदरणीय सभासद बंधू-भगिनींनो,**

आपल्या संस्थेचा ३६ वा वार्षिक अहवाल संचालक मंडळाच्यावतीने आपणास सविनय सादर करीत आहे. अहवाल वर्षात पतसंस्थेने समाधानकारक आर्थिक प्रगती केली आहे. कोव्हीड कालावधीतील प्रतिकूल परिस्थितीवर झालेल्या परिणामांमधून पतसंस्था या आर्थिक वर्षात बाहेर पडली असून संस्थेने आपल्या सांपत्तीक स्थितीमध्ये समाधानकारक वाढ केली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने आपली ग्राहकसंख्या वाढविण्याकडे भर दिला असून संस्थेने ग्राहकांसाठी विविध ठेवी व कर्जयोजनांद्वारे ग्राहकसंख्येमध्ये व पर्यायाने व्यवसायामध्ये वृध्दी करण्याचे योजले होते.

संस्थेने आपल्या ग्राहकांकरीता व नवीन ग्राहकांकरीता विविध आकर्षक योजना कार्यान्वित केल्या होत्या. त्यामध्ये सोन्याचे नाणे खरेदीकरीता केलेल्या **''सुवर्णसंचय कर्ज योजना''**ला उत्तम प्रतिसाद मिळाला व या योजनेअंतर्गत आपल्या ग्राहकांनी एकूण १६० तोळे सोनेनाणी खरेदी केली. संस्थेस या योजनेमधून रु. ७५,००,०००/- इतका कर्जव्यवसाय मिळाला.

**''सुखनिधी रिकरिंग डिपॉझिट''** योजनेअंतर्गत गणपती सणाकरीता अल्पबचत रिकरिंग डिपॉझिट योजना संस्थेने ग्राहकांकरीता आणली होती. सदर योजनेमध्ये संस्थेकडे ७७८ इतकी एकूण खाती उघडली गेली. तसेच संस्थेने नवरात्र व दिवाळीच्या कालावधीत मुदतठेवींची **''धनवर्धिनी ठेव योजना''** जाहीर केली होती व या योजनेसही ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

अशाप्रकारे अहवालवर्ष अखेर आपल्या संस्थेने रु.८९ कोटी इतक्या ठेवी संकलित केल्या असून संस्थेचा मिश्र व्यवसाय रु. १५५.८८ कोटी एवढा झाला आहे. संस्थेचा सी.डी. रेशो ६९.६८% आहे.

## पतसंस्थेच्या सांपत्तिक स्थितीचा आढावा

अहवाल वर्षात पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीची आकडेवारी खालीलप्रमाणे : *(रु. लाखात)*

| क्र. | तपशील | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | भाग भांडवल | २००.४२ | २३४.९५ | २४१.७३ | २४२.९५ | २४३.७१ | २३६.०७ | २३४.३८ |
| २) | भागधारक संख्या | ३९८० | ५२३२ | ६०८० | ६५६३ | ६८१६ | ७०३७ | ७४८१ |
| ३) | गुंतवणूक - निधी | ५५३.९८ | ६३६ | ६७९ | ७४८ | ७७८ | ९१० | ९७८ |
| ४) | गुंतवणूक - तरलता | २८१०.४१ | ३२१८ | २८२२ | २९६२ | २७३८.०८ | ३१८५ | २५०४ |
| ५) | ठेवी | ६६९८.४५ | ७३३४.४२ | ७३४४.६० | ७५१२.०३ | ७९३९.९९ | ८४४१.८४ | ८९००.४६ |
| ६) | कर्जे | ४२१८.२१ | ४४४०.४८ | ५०११.३६ | ५०७२.९९ | ५६९३.१४ | ५६७६.१९ | ६,६८७.६९ |
| ७) | ढोबळ नफा | ३५४.५६ | ४००.७० | ३९७.२५ | ३७२.१९ | ३६८.९७ | ३६८.४९ | ३८९.८२ |
| ८) | निव्वळ नफा | ८१.०६ | ८७.९० | ८८.९९ | ६०.७२ | ६५.३६ | ६९.९५ | ७७.५५ |
| ९) | खेळते भागभांडवल | ७९६१ | ८७८५ | ८८७३ | ९१११ | ९५६१.९३ | १०२४३.२७ | ११९९६.७३ |
| १०) | लेखापरिक्षण वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| ११) | अनुत्पादीत कर्जे एन.पी.ए. | १३२ | २१२ | २२९ | २३५ | २३३ | २६१ | २६९ |
| १२) | निव्वळ एन.पी.ए.(%) | २.३६ | २.६८ | ३.८० | ५.५३ | ५.६६ | ४.६८ | ३.९० |

## सभासद व भाग भांडवल

अहवाल वर्षात संस्थेच्या भागभांड्वलात ०.७१% घट झाली असून अहवाल वर्ष अखेर संस्थेकडे रु. २,३४,३८,७९०/- एवढे

वसूल भागभांडवल जमा आहे. अहवाल वर्षात ५४६ नवीन सभासद झाले असून १०२ सभासद राजीनामा, हस्तांतरण, मृत्यू इ. कारणास्तव कमी झालेले आहेत. दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची सभासद संख्या ७४८१ इतकी झाली आहे.

## ठेवी

अहवाल वर्ष अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रू. ८९.०० कोटी इतक्या झाल्या आहेत. पतसंस्थेच्या ठेवींमध्ये ५.४३% नी वाढ झाली आहे. अहवाल वर्षाअखेर एकूण जमा ठेवींवरील व्याज खर्च ६.९३% इतका झाला आहे.

## गुंतवणूक

माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये बँकांनी त्यांच्या ठेवींवरील व्याजदरात वाढ केली होती. या वाढीव व्याजदराचा लाभ घेण्यासाठी संस्थेने संस्थेच्या कमी व्याजदरांच्या गुंतवणूकींवर रु. ८,९०,००,०००/- ॲडव्हान्स/ओडी घेऊन सदर रक्कम जास्त व्याजदारांच्या ठेवींमध्ये गुंतवणूक केली.

सहकार खात्याने नव्याने जारी केलेल्या गुंतवणूक निकषांनुसार पतसंस्थेने आपल्या अतिरिक्त रक्कमेची गुंतवणूक केली आहे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|
| १) | दि कॉसमॉस को.ऑप बँक लि. | २३३ |
| २) | दि सारस्वत को-ऑप बँक. लि. | २३३ |
| ३) | जनकल्याण सहकारी बँक. लि. | २२२ |
| ४) | युनिटी स्मॉल फायनान्स बँक | १७२ |
| ५) | दि शामराव विठ्ठल को. ऑप. बँक लि. | १५० |
| ६) | दि महानगर कॉ.बँक लि. | १३० |
| ७) | दि नेव्हल डॉकयार्ड को-ऑप. बँक | १२५ |
| ८) | राजकोट सहकारी बँक, पुणे | १२४ |
| ९) | ठाणे जनता सहकारी बँक लि. | १२० |
| १०) | भारत को.ऑप. बँक, मुंबई लि. | ११८ |
| ११) | एन.के.जी.एस.बी.को.ऑप. बँक लि. | ११५ |
| १२) | श्री वारणा सहकारी बँक. लि. | ११४ |
| १३) | कराड अर्बन को-ऑप बँक. लि. | १०६ |
| १४) | जी.पी.पारसिक जनता सहकारी बँक. लि. | १०० |
| १५) | डोंबिवली नागरी सहकारी बँक. लि. | ६३ |
| १६) | जनता सहकारी बँक, पुणे | ६० |
| १७) | दि ग्रेटर को-ऑप. बँक लि. | ५५ |
| १८) | देवगिरी नागरी सहकारी बँक लि. | ५२ |
| १९) | दि चिपळूण अर्बन को.ऑप. बँक लि. | ५० |
| २०) | दि कल्याण जनता सह. बँक लि. | ४६ |
| २१) | सूर्योदय स्मॉल फायनान्स | २५ |
| २२) | दि यशवंत को.ऑप.बँक लि. | २५ |
| २३) | अभ्युदय को.ऑप.बँक लि. | २१ |
| २४) | अपना सहकारी बँक लि. | १६ |
| २५) | दि रेवदंडा को.ऑप.अर्बन बँक लि. | १५ |
| २६) | जळगाव जनता सहकारी बँक लि. | १० |
| २७) | अण्णासाहेब सावंत को.ऑप.अर्बन बँक लि. | ४ |
| | **एकूण** | **२५०४** |

## कर्ज व वसुली

अहवाल वर्ष अखेर संस्थेचे येणे कर्ज रू. ६६.८७ कोटी इतके असून मागील वर्षीच्या तुलनेत येणे कर्जामध्ये रू. १० कोटींनी वाढ झाली आहे. अहवाल वर्षात संस्थेने रू. २८.६२ कोटी इतके कर्ज वाटप केले असून रू. १८.५१ कोटी एवढे कर्ज वसूल केले आहे. अहवाल वर्षात संस्थेचे एकूण येणे कर्ज रक्कमापैकी ८९% तारणी कर्जे आहेत.

अहवाल वर्ष अखेर संस्थेने एन.पी.ए. करीता रू. १० लाख एवढ्या रकमेची तरतूद केली असून अहवाल वर्ष अखेर संस्थेची एन.पी.ए. रक्कम रू.४५४ लाख एवढी आहे. संस्थेचा निव्वळ एन.पी.ए. ३.९०% आहे.

## थकीत कर्ज वसुली

पतसंस्थेच्या संपूर्ण कारभारात थकीत कर्जवसुली हा अतिशय महत्त्वाचा व कठीण टप्पा असतो. आपल्या संस्थेने थकीत कर्जवसुलीकरीता स्वतंत्र ''कर्जवसुली विभाग'' स्थापन केलेला आहे. सदर विभागातील अधिकारी व कर्मचारी कर्जवसुलीबाबत काळजी घेत असतात व आवश्यकतेनुसार विविध प्रकारची कारवाई थकीत कर्जदारांवर केली जाते. आपल्या संस्थेचा सामोपचाराने व सामंजस्याने कर्जवसुली करण्यावर भर असतो. परंतु कर्जवसुली ही अपरिहार्य असल्याने आपणास सक्तीची कर्जवसुली कायदेशीर मर्यादेचे पालन करून करावी लागते. जाणीवपूर्वक कर्ज थकविणाऱ्या कर्जदारांवर संस्था कडक कारवाई करत असते. संस्थेच्या सर्व कर्जदार व जामिनदार सभासदांना आवाहन करण्यात येते की पतसंस्थेने दिलेले कर्ज नियमित व वेळेत दिलेल्या हप्त्याप्रमाणे भरून संस्थेस सहकार्य करावे व आपल्यावरील कायदेशीर कारवाई टाळावी.

## निर्लेखन

वरीलप्रमाणे कार्यवाही करूनसुध्दा काही कर्जदार आणि त्यांचे जामिनदार यांचेकडून काही अपरिहार्य कारणामुळे संबंधित रक्कमेची वसुली होऊ शकत नाही. त्यामुळे अशा कर्जांचे निर्लेखन करणे आवश्यक असते. याकरीता अशी कर्ज प्रकरणे शासकीय लेखापरिक्षकांकडून प्रमाणित करून नियम ४९ अन्वये निर्लेखनासाठी सभेपुढे ठेवलेली आहेत. ही कर्जे निर्लेखन करण्यास आपण मान्यता द्यावी, ही विनंती.

## नफा व नफा विभागणी

दि. ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेचा ढोबळ नफा रु. ३८९.८२ लाख एवढा झाला असून ढोबळ नफ्यातून देणे व्याज, खर्च आणि तरतुदी वगळता संस्थेला रु. ७७.५५ लाख एवढा निव्वळ नफा झाला आहे.

*(रु. लाखात)*

| | | | |
|---|---|---|---|
| | **ढोबळ नफा** | | **३८९.८२** |
| वजा – १) | घसारा | ७.४० | |
| २) | लेखापरिक्षण फी | ३.३० | |
| ३) | एन.पी.ए. तरतूद | १०.०० | |
| ४) | भविष्य निर्वाह निधी तरतूद | ०.८२ | |
| ५) | सानुग्रह अनुदान तरतूद | ६.१२ | |
| ६) | व्याज देणे | २८४.६३ | ३१२.२७ |
| | निव्वळ नफा | | ७७.५५ |
| | अहवाल वर्षातील निव्वळ नफा (पूर्ण रकमेत) रु. | | ७७,५५,२०८.४९ |
| | मागील वर्षातील शिल्लक नफा | | ४,३२३.९३ |
| | | | ७७,५९,५३२.४२ |

सहकार खात्याकडून केलेल्या सूचना आणि मार्गदर्शक तत्वे यांना अधीन राहून उपरोक्त ढोबळ नफ्याची विभागणी केलेली आहे. तसेच पुढील प्रमाणे निव्वळ नफ्याची विभागणी केलेली आहे. त्यास सभेने मान्यता द्यावी ही विनंती.

### नफा विभागणी :

| अ.क्र. | तपशील | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १. | राखीव निधी - नफ्याच्या २५% | १९,३८,८०२ |
| २. | लाभांश - 10% (प्रस्तावित) | २३,५८,४३० |
| ३. | लाभांश समीकरण निधी - नफ्याच्या २% | १,५५,१०४ |
| ४. | कर्मचारी/संचालक प्रशिक्षण निधी | १,५०,००० |
| ५. | कर्मचारी कल्याण निधी | २,००,००० |
| ६. | कर्मचारी निवृत्ती रजा वेतन निधी | १,००,००० |
| ७. | ग्रॅच्युईटी खाते | १,५०,००० |
| ८. | स्वागत व आदरातिथ्य | १,५०,००० |
| ९. | निवडणूक निधी | ५०,००० |
| १०. | सभासद कल्याण निधी | ५०,००० |
| ११. | धर्मादाय निधी | १,५०,००० |
| १२. | वार्षिक/विशेष सभा खर्च | १,५०,००० |
| १३. | व्यवसाय वृद्धीकरण निधी | ३,००,००० |
| १४. | इमारत निधी | ५,००,००० |
| १५. | सहकार प्रसार निधी | २,००,००० |
| १६. | उत्सव निधी | ५०,००० |
| १७. | गुंतवणूक चढउतार निधी | ५,००,००० |
| १८. | उत्तम जिंदगीवरील तरतूद | ५,००,००० |
| १९. | लिगल फी | १,००,००० |
| | नफा तोटा पत्रकास वर्ग | ७,१९६ |
| | **एकूण** | **७७,५९,५३२** |

### शाखा कामगिरी

अहवाल वर्षात संस्थेच्या तीनही शाखांची आर्थिक कामगिरी पुढीलप्रमाणे

**पनवेल शाखा :** (रक्कम रु.लाखात)

| तपशिल | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | ५३५१.९८ | ५४९४.३१ | ५७९३.९६ | ६,१५४.६४ | ६३७९.६८ |
| कर्जे | ३८७२.२७ | ४०१६.४४ | ४७०३.३८ | ४६५१.६८ | ५३३३.८९ |

### सेक्टर १५ शाखा :

| तपशिल | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | १२४०.१६ | १२३९.९६ | १२८४.७२ | १३३४.११ | १४२०.२९ |
| कर्जे | ८२२.१८ | ७५८.८६ | ६९५.१२ | ७४८.७७ | ८८२.१० |

### सेक्टर ०३ शाखा :

| तपशिल | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | ७५२.४५ | ७७७.७४ | ८६१.३१ | ९५३.०८ | ११००.४८ |
| कर्जे | ३१६.९० | २९७.६८ | २९४.६३ | २७५.७५ | ४७१.७० |

### संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे

अहवाल वर्ष अखेर संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे असलेल्या कर्ज रक्कमेचा तपशील पुढील प्रमाणे :

| अ.क्र. | तपशील | दि.३१.३.२४ अखेर येणे रक्कम (रु.) | दि.३१.३.२४ अखेर अनियमीत रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | संचालक | -- | -- |
| २. | नातेवाईक | ६६,४८९/- | -- |

संस्थेने नोव्हेंबर २०२३ रोजी ३५ वर्षे पूर्ण केली. यानिमित्ताने संस्थेने काही कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यापैकी महत्त्वाचे कार्यक्रम म्हणजे :

१) मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व केशवस्मृति पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तांतरण या विषयावर दि. ६ मे २०२३ रोजी गोखले सभागृह येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र स्टेट को.ऑप.हौसिंग फेडरेशन लि. मुंबईचे तज्ञ संचालक ॲड.श्री.प्रसाद परब हे उपस्थित होते.

२) स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त दि. २७ मे २०२३ रोजी ''स्वातंत्र्यवीर सावरकर लंडन ते अंदमान'' या विषयावर श्री.पार्थ बावस्कर यांचे व्याख्यान पतसंस्था, नववर्ष स्वागत समिती व श्री विरुपाक्ष महादेव मंदिर न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

३) दि. ०४.०२.२०२४ रोजी संस्थेच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त गोखले सभागृह येथे श्री.पार्थ बावस्कर यांचे ''वन्दे मातरम'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच त्याच दिवशी विविध सामाजिक संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याकरीता कृतज्ञता निधी समर्पण सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा पतसंस्थांच्या महासंघाचे अध्यक्ष ॲड.श्री.जे.टी. पाटील उपस्थित होते.

### श्रद्धांजली

सरत्या आर्थिक वर्षात दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर नेते, समाजसुधारक, शहीद जवान व अधिकारी, पोलिस दलातील शहीद कर्मचारी व अधिकारी इ.च्या प्रती केशवस्मृति परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

## ऋणनिर्देश

संस्थेच्या प्रगतीमध्ये अनेक लहान मोठ्या घटकांचा सहभाग असतोच. संस्थेचे सर्व भागधारक, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, माजी संचालक, हितचिंतक यांनी संस्थेच्या प्रगतीत जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले, त्याबद्द्ल मी त्यांचे आभार मानतो. तसेच मा.जिल्हा उपनिबंधक, अलिबाग, रायगड व त्यांचे कार्यालयातील अधिकारी वर्ग, मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल व त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग ह्यांनी आम्हाला वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्द्ल त्यांचे आभार.

सहकार भारतीचे राष्ट्रीय सचिव प्रा.उदयजी जोशी ह्यांनी संस्थेच्या कामकाजात जे मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्द्ल त्यांचे आभार. तसेच रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघ म.अलिबाग यांचे अध्यक्ष ॲड.श्री.जे.टी. पाटील, सर्व संचालक व कर्मचारी वर्ग यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्द्ल आभार.

संस्थेशी निगडीत असलेल्या बँकांमधील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे सहकार्याबद्द्ल आभार.

संस्थेचे अंतर्गत हिशेब तपासनीस श्री.अभिषेक सलाग्रे व त्यांचे सहकारी, कायदेशीर सल्लागार ॲड.पराग म्हात्रे, व ॲड.श्री.राजेंद्र गोडबोले, सी.ए.श्री.मुकुंद वैशंपायन, सी.ए.श्री.अतुल शेट्ये, सी.ए.श्री.मिलिंद वैशंपायन, शासनमान्य मूल्यांकनकार श्री.एन.जी.गोरे ह्यांनी संस्थेच्या कामकाजात केलेल्या मार्गदर्शनाबद्द्ल आभार. आपल्या संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी,संचालक, अधिकारी, कर्मचारी व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी आपली कामे योग्य रितीने पार पाडली, त्याबद्द्ल मी त्यांचे आभार मानतो व भविष्यातही आपणा सर्वांकडून संस्थेस असेच सहकार्य मिळेल अशी आशा व्यक्त करून सदरचा अहवाल आपणापुढे मंजूरीकरीता ठेवीत आहे.

**अमित म. ओझे**
**अध्यक्ष**

## दि.०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४

| सन २०२२-२०२३ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | सन २०२३-२०२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | **बँक व्याज खाते** | | ८,९०,२५१.०० |
| ४६,५१०.०० | ओ डी खाते व्याज | ८,९०,२५१.०० | |
| | **पगार खाते** | | ९६,६७,४७०.०० |
| ६४,०२,७८१.०० | कर्मचारी पगार खाते | ६८,२५,९६०.०० | |
| २,०१,६००.०० | कर्मचारी प्रवास भत्ता खाते | १,७०,०००.०० | |
| ६,३८,२६५.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खर्च | ५,३६,७३०.०० | |
| १,५१,३२६.०० | ग्रॅच्युटी | ९,३५,४९५.०० | |
| ८,२०,७४१.०० | सानुग्रह अनुदान | ११,९७,५९३.०० | |
| १,९४४.०० | कामगार कल्याण निधी खर्च | १,६९२.०० | |
| | **भाडे, कर व विमा खाते** | | १२,५६,३६५.५० |
| ९,०३,३३०.७६ | भाडे, कर व विमा खाते | १२,५५,६१५.५० | |
| ७५०.०० | व्यवसाय कर खाते | ७५०.०० | |
| ०.०० | आयकर खाते | ०.०० | |
| | **दिलेले कमिशन** | | ११,०५,७०२.३८ |
| १५,९६७.२४ | बँक चार्जेस | १०,५४६.३८ | |
| ११,३४,३०३.०० | स्वल्पबचत कमिशन | १०,९५,१५६.०० | |
| | **इतर खर्च** | | १२,३६,०४९.४२ |
| १,४७,८०१.३१ | छपाई खर्च | १,०२,५७७.२२ | |
| १०,९८५.०० | प्रवास खर्च | २,७०५.०० | |
| १,०२,२४१.७४ | जाहिरात व प्रसिद्धी खर्च | ९३,६६०.७४ | |
| ४,४७,३७३.२६ | टपाल खर्च | ४,१५,३३४.१६ | |
| २,१२,७६६.५० | कार्यालयीन खर्च | १,७६,४७४.०० | |
| ४,०४,२३४.०२ | दुरूस्ती व देखभाल खर्च | ४,२६,७३८.३० | |
| १९,२०५.०० | इंधन खर्च व कर्मचारी प्रवास खर्च | १८,५६०.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## अखेरचे नफातोटा पत्रक

| सन २०२२-२०२३ रूपये पैसे | जमा | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| 0.00 | उत्तम जिंदगी तरतूद | | २५,८४,१२२.00 |
| १,३७,१६,८१२.८५ | सहकारी संस्था व बँक गुंतवणूकीवरील व्याज | | ७८,४३,३०४.00 |
| | **मुदत ठेवीवरील व्याज** | | |
| | कर्जदार सभासदांकडून मिळणारे उत्पन्न | | २६,२१,११०.६१ |
| २४,६६४.२८ | फॉर्म फिज | १९,५६९.६१ | |
| १७,६५०.00 | नोटिस फी खाते | २३,८५0.00 | |
| १८,६२,५५२.८४ | सेवा शुल्क | २५,७७,६९१.00 | |
| | सभासदांकडून आलेले व्याज | | ५,७२,९८,१८३.00 |
| ७३,१७,९९३.00 | वैयक्तिक कर्ज व्याज | ६१,१९,५७१.00 | |
| १०,६४,६७३.00 | मुदत ठेव तारण कर्ज व्याज | ५,८१,५८९.00 | |
| ५०,१८७.00 | स्वल्पबचत कर्ज व्याज | ४७,७६५.00 | |
| १२,८६१.00 | मासिक ठेव तारण कर्ज व्याज | ३६,१८१.00 | |
| २,०६,५९८.00 | गृह तारण कर्ज व्याज | २,१८,३४६.00 | |
| ३,६६,८१,१६६.00 | तारण कर्ज व्याज | ३,३५,३७,४८४.00 | |
| १६,५८,१८०.00 | वाहन तारण कर्ज व्याज | ७,५२,८२०.00 | |
| ४०,५५,७८१.00 | सोने तारण कर्ज व्याज | ४४,७६,९७१.00 | |
| ९,१०,९७५.00 | मॉर्गेज ओ.डी.कर्ज व्याज | १,१२,८३,२९९ | |
| ९,३०४.00 | कॅश क्रेडीट कर्ज व्याज | २,४४,१५७.00 | |
| १,०७,९२,४४७.00.00 | गुंतवणूकीवरील व्याज येणे | १,६३,०३,१३९.00 | १,६३,०३,१३९.00 |
| | अन्य उत्पन्न | | १,५७,७५९.४३ |
| २,८०,६५२.४० | म.रा.वि.मंडळ कमिशन | १,१६,३६४.४३ | |
| ३८,९६०.५० | सुरक्षा ठेव व्याज म.रा.वि.मंडळ | ४१,३९५.00 | |
| ५,१८९.00 | डिमांड ड्राफ्ट चार्जेस | 0.00 | |
| | सहकारी संस्था व बँक लाभांश | | १,३७,९४०.२० |
| २००.00 | लाभांश रायगड महासंघ | 0.00 | |
| १,३७,९४०.२० | लाभांश युनिटी फायनान्स (पी.एम.सी.) | १,३७,९४०.२० | |
| १,७७,३९५.00 | किरकोळ उत्पन्न | | १,६९७.५५ |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## दि.०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४

| सन २०२२-२०२३ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | **ठेवीवरील दिलेले व्याज** | | ६,१९,१४,२३६.०० |
| ५,०५,२३,०१२.०० | मुदत ठेव व्याज | ५,३५,३४,०७७.०० | |
| ११,०६,११४.०० | मागणी ठेव व्याज | १६,१७,६१४.०० | |
| २७,३३,२३४.०० | मासिक ठेव व्याज | २६,१६,७५७.०० | |
| ०.०० | सुखनिधी मासिक ठेव योजना व्याज | ६,९२,७२६.०० | |
| २४,७६,१३८.०० | बचत ठेव व्याज | २३,२८,३२५.०० | |
| १०,०२,१९०.०० | स्वल्प बचत व्याज | ११,२४,७३७.०० | |
| | **संचालक सभा व भत्ते** | | ४९,७४५.०० |
| ३,९९०.०० | सभा खर्च | ६,५०५.०० | |
| ४४,१८०.०० | सभा भत्ता खाते | ४३,२४०.०० | |
| ९,३९,२८८.०० | **घसारा** | | ७,४०,५५५.०० |
| ९१,१२७.२३ | कर्ज वसूली खर्च | | २,४८,०५२.०० |
| ३,०२,४५०.०० | लेखापरिक्षण शुल्क खाते | | ४,४५,१५०.०० |
| १,७५,७२०.०० | प्रोफेशनल फीज खर्च | | २,५६,७८०.०० |
| १,३५,३७२.०० | लवाद व दावे खर्च खाते | | २,०९,८८०.०० |
| १६,५४०.०० | महासंघ वर्गणी | | १४,७२०.०० |
| ७,००,०००.०० | संशयित व बुडीत कर्ज खाते | | १०,००,०००.०० |
| ०.०० | बँक चार्जेस कर्ज खाते | | ०.०० |
| १,१५,५८९.३५ | आर.सी.एम.वरील जी.एस.टी. | | १,००,८५७.०० |
| ०.०० | गुंतवणुकीवरील जादा घेतलेले व्याज | | ५६,२३४.०० |
| **६९,९५,११३.०१** | **नफा** | | ७७,५५,२०८.४९ |
| ७,९०,२२,१८२.०७ | **एकूण** | | ८,६९,४७,२५५.७९ |

## अखेरचे नफातोटा पत्रक

| सन २०२२-२०२३ रूपये पैसे | जमा | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ७,९०,२२,१८२.०७ | एकूण | | ८,६९,४७,२५५.७९ |

**सौ.ज्योती कानिटकर**
उपाध्यक्ष

**श्री.अमित म.ओझे**
अध्यक्ष

दि. ३१.०३.२०२४

| सन २०२२-२३ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२३-२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ४,००,००,०००.०० | **अधिकृत भागभांडवल** | | ४,००,००,०००.०० |
| २,३६,०६,१४०.०० | वसुल भागभांडवल | २,३४,३८,७९०.०० | २,३४,३८,७९०.०० |
| ८,९१,३६,४०२.८१ | **निधी** | | ९,२६,८०,९६६.१३ |
| २,४४,१५,१२८.१० | राखीव निधी | २,६३,४१,५३१.९२ | |
| १,५७,२७,७३६.६४ | इमारत निधी | १,६२,२७,७३६.६४ | |
| ४,४६,७२,७५१.५७ | बुडीत व संशयित निधी | ४,५४,५४,०७३.६९ | |
| १७,२३,५२४.०० | लाभांश समीकरण निधी | १८,६३,४२६.०० | |
| १,०१,३९५.०० | धर्मादाय निधी | १,५४,३९५.०० | |
| ७५,०२९.५० | व्यवसाय वृध्दीकरण निधी | १,२५,११२.७८ | |
| १,६८,१९१.०० | प्रशिक्षण निधी | २,४०,३७१.०० | |
| २,४३,०१५.०० | निवडणूक निधी | २,६८,०१५.०० | |
| ३,५१,८९४.०० | उत्सव निधी | २,७८,७२४.२० | |
| ९,२८,१७१.०० | कर्मचारी निवृत्ती रजा वेतन निधी | ८,९४,१४२.०० | |
| ५,४८,८०८.०० | सभासद कल्याण निधी | ५,९७,१४८.०० | |
| १,८०,७५९.०० | कर्मचारी कल्याण निधी | २,३६,२८९.९० | |
| ८४,४१,८३,६१०.१० | **ठेवी** | | ८९,००,४६,४०२.१० |
| २,२१,५५,०६९.०० | मागणी ठेव | २,५२,५३,४४३.०० | |
| ६,८९,६८,८९८.१३ | बचत ठेव | ७,०६,६७,१२९.११ | |
| 0.00 | दरमहा व्याज योजना | ६,५१,२२,६९१.०० | |
| ६९,४५,५२,२१८.०० | मुदत ठेव | ६६,३९,४६,११९.०० | |
| ३,८८,९३,९५०.०० | आवर्त ठेव | २,४६,०९,९८०.०० | |
| 0.00 | सुखनिधी आवर्त ठेव योजना | २,२७,६०,९००.०० | |
| १,९६,१३,४७५.०० | स्वल्पबचत ठेव | १,७६,८६,१४०.०० | |
| ४,१५,३८७.०० | **अन्य देणी** | | ३,७८,०८६.०० |
| ४,११,१८७.०० | लाभांश देणे | ३,७०,८८६.०० | |
| ४,२००.०० | कर्मचारी व संचालक वर्गणी- महाराष्ट्र स्टेट वेल | ७,२००.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२२-२३ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ८,९९,९९०.०० | **रोख शिल्लक** | | १६,४५,४९७.०० |
| २१,९२,२५९.३१ | **बँक बचत/चालू खाते शिल्लक** | | ११,४१,७३७.२९ |
| ९,२७,३१,००९.७० | **निधी गुंतवणूक** | | १०,१५,७८,८१७.७० |
| २,६१,८८४.०० | लिगल फीज गुंतवणूक | २,६३,७२३.०० | |
| ९,७७,७२३.०० | कर्मचारी निवृत्ती निधी गुंतवणूक | ९,९६,५८२.०० | |
| २,५६,७९,१४१.७० | राखीव निधी गुंतवणूक | २,७४,४६,६४२.७० | |
| ४,५२,८९,८६९.०० | बुडीत व संशयीत कर्ज निधी | ४,७४,१९,६७२.०० | |
| १,६४,३१२.०० | आदरातिथ्य गुंतवणूक | १,६६,२८४.०० | |
| १,९४,३३०.०० | कर्मचारी कल्याण निधी गुंतवणूक | १,९६,२०७.०० | |
| ५,१५,५९३.०० | उत्सव निधी गुंतवणूक | ५,२४,४१५.०० | |
| ४,४६,८५५.०० | तात्काळ रुग्णसेवा गुंतवणूक | ४,५१,१७२.०० | |
| १,००,६१,१४१.०० | इमारत निधी गुंतवणूक | १,३६,०१,९४७.०० | |
| ११,३८,७६३.०० | लाभांश समिकरण निधी गुंतवणूक | १८,८७,५२६.०० | |
| ५१,९६०.०० | धर्मादाय निधी गुंतवणूक | ५२,४६१.०० | |
| ५,३४,५०३.०० | सभासद कल्याण निधी गुंतवणूक | ५,४०,८२४.०० | |
| ३,३३,५१९.०० | निवडणूक निधी गुंतवणूक | ३,४१,२८१.०० | |
| ६७,७०,६३७.०० | गुंतवणूक चढ उतार निधी गुंतवणूक | ७३,७६,१०५.०० | |
| २,०६,८५९.०० | सहकार प्रसार खाते गुंतवणूक | २,०९,०५२.०० | |
| १,०३,९२०.०० | प्रशिक्षण निधी गुंतवणूक | १,०४,९२४.०० | |
| ४२,३४,५८३.०० | **मासिक ठेव गुंतवणूक** | | ८,२१,७९१.०० |
| ३२,६०,४१,१२४.०० | **मुदत ठेव गुंतवणूक** | | ३७,१९,७१,९१५.०० |
| ५६,७६,१९,३४३.९३ | **कर्ज** | | ६६,८७,६९,४८४.३० |
| २,७२,८७९.०० | मासिक ठेव तारण कर्ज | ८,७६,६४५.०० | |
| ५,६६,३८२.०० | स्वल्पबचत तारण कर्ज | ५,०१,३८२.०० | |
| ३,६३,९२,९१६.०० | सोने तारण कर्ज | ४,८२,८५,९५६.०० | |
| ५९,८८,६८९.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ६७,९९,३२६.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

**दि. ३१.०३.२०२४**

| सन २०२२-२३ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२३-२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ०.०० | **बँक ओडी खाते** | | १०,५०,०८,५९४.१० |
| ८४,८१,८४२.२९ | **तरतूदी** | | ९६,६७,९१५.०० |
| ०.०० | कर्मचारी सानुग्रह अनुदान तरतूद | ६,१२,०००.०० | |
| २,२५,०००.०० | लेखापरिक्षण शुल्क देणे | २,९७,०००.०० | |
| ३३,५१९.०० | टी.डी.एस.देणे | २१,९७२.०० | |
| ४७,०६५.०० | सहकार प्रसार खाते तरतूद | २,०७,०९५.०० | |
| २,०२,२५६.७३ | जी.एस.टी.देणे | ६४,२१७.३४ | |
| ६६,००,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी तरतूद | ७०,००,०००.०० | |
| ४,००,०००.०० | तात्काळ रुग्णसेवा | ४,००,०००.०० | |
| ३,४२,५५३.५६ | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च तरतूद | ३,३०,५८२.६६ | |
| ३,१६,८०४.०० | आदरातिथ्य खर्च तरतूद | ३,५९,५८८.०० | |
| १,८७,९६५.०० | लिगल फीज देणे | २,१२,९६५.०० | |
| १,२६,६७९.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी तरतूद | १,६२,४९५.०० | |
| ३,४९,०४,९११.०० | **ठेवीवरील व्याज देणे** | | ३,४८,३९,२३७.०० |
| २२,०८,७७७.०० | व्याज देणे मागणी ठेव | १९,६१,९४५.०० | |
| ३,१२,१६,९११.०० | व्याज देणे मुदत ठेव | ३,१०,८९,६७४.०० | |
| १४,७९,२२७.०० | व्याज देणे मासिक ठेव | १७,८७,६१८.०० | |
| | **इतर** | | |
| १,६५,८४,२८७.०० | व्याज येणे तरतूद | | ३,५८,५४,०६४.०० |
| १७,९६३.९२ | नफा तोटा (संचीत) खाते | | ४,३२३.९३ |
| ६९,९५,११३.०१ | अधिक चालू सालचा नफा | | ७७,५५,२०८.४९ |
| १,०२,४३,२६,१६१.१६ | बेरीज पुढील पानावर | | १,१९,९६,७३,५८६.७२ |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२२-२३ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १२,०५,३४,९८९.०० | मॉर्गेज ओव्हरड्राफ्ट कर्जे | २४,४६,३०,११२.०० | |
| ६,५४,६२,१४९.०३ | वैयक्तिक कर्ज | ५,९१,४५,७३३.९० | |
| १,४२,९५,३१६.०० | वाहन तारण कर्ज | १,२०,२९,०५११.०० | |
| ८४,५१,४७७.०० | मालतारण कर्ज | ६८,२९,८३२.०० | |
| ३१,३१,७८,८६३.४० | तारणी कर्ज | २८,३९,०२,५११.४० | |
| १२,१९,७५८.०० | प्रमाणपत्र तारण कर्ज | १०,४४,८११.०० | |
| ७,८९,६९३.०० | कॅश क्रेडीट कर्ज | २१,९०,३७२.०० | |
| ४,६६,२३२.५० | गृह तारण कर्ज | २५,३३,७५२.०० | |
| **६६,६९,६४४,.०७** | **स्थावर व जंगम मालमत्ता** | | **६०,३५,६५२,.०३** |
| १,२८,२५५.०० | दुचाकी गाडी | १,०९,०१७.०० | |
| १९,४३,६२३.०० | फर्निचर | १७,९४,९८२.०० | |
| ७,३६,७७६.१६ | इलेक्ट्रिकल फिटिंग | ६,७९,२९५.१५ | |
| १,१८,६३१.०० | एअर कंडिशनर | १,००,८३६.०० | |
| ५६,७४३.०० | सिक्युरीटी सामुग्री | ५१,०६९.०० | |
| ३८,७३४.०७ | संगणक | २२,५८०.०४ | |
| ८१,६०९.४५ | डेडस्टॉक | ७०,२१२.४५ | |
| २१,६८७.३९ | करन्सी काऊंटिंग मशीन | १८,४३४.३९ | |
| ३५,४३,५८५.०० | कार्यालयीन जागा | ३१,८९,२२६.०० | |
| **३७,१००.००** | **अन्य गुंतवणूक** | | **३७,१००.००** |
| **१४,८३,१८९.६५** | **अन्य ठेवी** | | **१४,८४,२०९.६५** |
| ५२,२६०.०० | सिक्युरीटी डिपॉझीट म.रा.वि.म.जोडणी | ५२,८८०.०० | |
| ६,९३४.६५ | सुविधा डिपॉझिट | ६,९३४.६५ | |
| ९,७४,०००.०० | म.रा.वि.म. अनामत | ९,७४,०००.०० | |
| ९,०००.०० | दूरध्वनी अनामत | ९,०००.०० | |
| ४,००,०००.०० | कार्यालय अनामत | ४,००,०००.०० | |
| ४१,३९५.०० | म.रा.वि.म ठेव व्याज येणे | ४१,३९५.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२२-२३ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२३-२४ रु पये पैसे |
|---|---|---|---|
| १०२,४३,२६,१६१.१६ | एकूण | | ११९,९६,७३,५८६.७२ |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२२-२३ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२३-२४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १५,०२७.३१ | खरेदीवरील इनपुट टॅक्स क्रेडीट | | २४,७९४.९५ |
| ५,000.00 | ॲधेसिव्ह स्टॅंप येणे | | १,000.00 |
| १,६५,८४,२८७.00 | कर्जावरील येणे व्याज | | ३,५८,५४,0६४.00 |
| ५,५५,९४९.७३ | टी.डी.एस. | | ५,६१,४५८.७३ |
| १२,९६,९५४.९४ | टी.डी.एस.२0२0-२१ | | १२,९६,९५४.९४ |
| ११,९३,६७२.२0 | टी.डी.एस.२0२१-२२ | | ११,९३,१४९.२0 |
| १७,९७,२७१.00 | टी.डी.एस.२0२२-२३ | | १८,२४,५६२.५0 |
| 0 | टी.डी.एस.२0२३-२४ | | १९,८८,८६८.00 |
| ६३,३११.0६ | आय.टी.सी. | | १४,0५६.४३ |
| ७,९२,४३९.00 | ॲडव्हान्स अपील कर | | ७,९२,४३९.00 |
| ३१,३५९.00 | प्रिपेड खर्च | | ५१,९१३.00 |
| ८२,६४६.२६ | म.रा.वी.मंडळ कमिशन येणे | | 0.00 |
| 0 | उत्तम जिंदगीवरील तरतूद | | २५,८४,१२२.00 |
| १0२,४३,२६,१६१.१६ | एकूण | | ११९,९६,७३,५८६.७२ |

**सौ.ज्योती कानिटकर**
**उपाध्यक्ष**

**श्री.अमित म.ओझे**
**अध्यक्ष**

# सन २०२४ - २०२५ चे अंदाजपत्रक

| तपशील | रक्कम (रु.) | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| येणे व्याज | ६,५६,६५,३७३ | देणे व्याज | ६,८३,७१,४१३ |
| गुंतवणूकीवरील व्याज | २,६३,८५,४२० | भाडे, कर व विमा | १३,८२,००२ |
| अन्य उत्पन्न | ३०,००,००० | पगार खाते | १,०१,५०,८४४ |
| | | टपाल खाते | ४,५६,८६७ |
| | | छपाई खाते | १,०७,७०६ |
| | | लवाद दावा खाते | १,००,००० |
| | | प्रवास खाते | ४२,५३० |
| | | संचालक सभा भत्ते व खर्च | ५२,२३२ |
| | | आयकर | १,५०,००० |
| | | कार्यालयीन खर्च | २,०२,९४५ |
| | | कमिशन | ११,४९,९१४ |
| | | घसारा | ७,७७,५८३ |
| | | ऑडीट फी | ४,८९,६६५ |
| | | मालमत्ता विक्री तोटा | ५०,००० |
| | | वस्तू व सेवा कर | १,५०,००० |
| | | दुरूस्ती व मेंटेनन्स | ४,६९,४१२ |
| | | प्रोफेशनल फीज | २,८२,४५८ |
| | | रायगड जिल्हा महासंघ-वर्गणी | १५,४५६ |
| | | अन्य खर्च | २५,००० |
| | | एन.पी.ए.तरतूद | १५,००,००० |
| | | कर्ज वसुली खर्च | २,७२,८५७ |
| | | निव्वळ नफा | ८८,५१,९०९ |
| **एकूण** | **९,५०,५०,७९३** | **एकूण** | **९,५०,५०,७९३** |

# वैधानिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल

१) आम्ही केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल,या संस्थेचा सोबत जोडलेल्या आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण केले आहे. ज्यामध्ये दि.३१/०३/२०२४ अखेरचे ताळेबंद पत्रक असून त्या वर्षाच्या अखेरपर्यंतचे नफा-तोटा विवरणपत्रक तसेच हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि स्पष्टीकरण माहिती दिलेली असून संस्थेचे दि.०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या कालावधीचे लेखापरिक्षण केले आहे.

२) आर्थिक विवरणपत्राबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :
महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० आणि त्या खाली बनविलेले या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण, संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

३) लेखापरिक्षकाची जबाबदारी :
केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या पायावरआहे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस् ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम यांच्या प्रमाणकाप्रमाणे लेखापरिक्षणाचे संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितिमूल्यांचे पालन होणे जरुरीचे आहे व ते आम्ही पाळले आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरणापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व लेखापरिक्षेमध्ये अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्त्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण, अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमा खर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोगाचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण याचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षेचा पुरावा जो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केलेला आहे.
१. ताळेबंदपत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२४ अखेरचे
२. नफा आणि तोटा विवरणपत्रकाच्या बाबतीत त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशीचा नफा दिसतो.

७) इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल :
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा-तोटा विवरण तयार केलेले आहे

८) आम्ही अहवाल देतो की,
अ) आम्हाला मिळालेल्या माहितीवरुन आणि स्पष्टीकरणानुसार जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरुरी आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हाला असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.
ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीत आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहेत.
क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकप्रमाणे ताळेबंद पत्रक व नफा आणि तोटा हिशोब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो -
१) या अहवाला संदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा तोटा आणि खर्चाचा हिशोब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.
२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.
३) सन २०२३-२४ या कालावधीसाठी संस्थेला 'अ' लेखापरिक्षण वर्ग मिळालेला आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५/०६/२०२४

सही/-
**पी.जी.रानडे अँड कंपनी**
सनदी लेखापाल

# केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

**मुख्यालय - १०२/१०३ आदित्य विहार को.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल फोन : ८६५७००१८४१**

**पनवेल शाखा** : शॉप नं.३, ४, सदाशिव १ को-ऑप. हौसिंग सोसायटी, टिळकरोड पनवेल. फोन नं. : ८६५७००१८४२

**सेक्टर १५ शाखा** : साई आर्केड अपार्टमेंट, शॉप नं.५, प्लॉट नं.२०, सेक्टर १५ अे, नविन पनवेल. फोन नं. : ८६५७००१८४३

**सेक्टर ३ शाखा** : रिद्धी सिद्धी रेसिडेंसी, शॉप नं.१४, सेक्टर ३, नविन पनवेल. फोन नं. : ८६५७००१८४४

| |
|---|
| **श्री.अभिषेक सलाग्रे (सी.ए.)**<br>अंतर्गत हिशेब तपासनीस |
| **श्री.पराग म्हात्रे (ॲडव्होकेट व नोटरी)**<br>कायदेशीर सल्लागार |
| **श्री.अनिल मानकामे**<br>सुवर्णमूल्यांकनकार |
| **श्री.एन.जी.गोरे**<br>शासनमान्य मूल्यांकनकार |

## स्वल्पबचत प्रतिनिधी

| | |
|---|---|
| श्री.घन:श्याम आगाशे | श्री.संजीव बहिरा |
| श्री.रमेश सावंत | श्री.सुनिल केळसकर |
| सौ.शशिकला कद्रे | |

## सभासदांकरीता सूचना

१) सभासदांना संस्थेच्या योजनांबाबतची माहिती व इतर सूचना सभासदांपर्यंत पोहोचविण्याकरीता सभासदांनी संस्थेचा व्हॉट्सॲप नंबर आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह **(save)** करून ठेवावा व त्याची माहिती नजीकच्या कार्यालयात द्यावी. व्हॉट्सॲप नंबर - ९९३०८९८७३३

२) वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यावर उपस्थित सभासदांसाठी भोजनाची व्यवस्था केली आहे.

**सौ. ज्योती कानिटकर**
उपाध्यक्षा

केशवस्मृति
नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

# ॥ संस्थेच्या ३५ व्या वर्धापनदिन सोहळ्यातील काही क्षणचित्रे ॥



संस्थेच्या वर्धापनदिन सोहळ्याचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे - मा.ॲड.जे.टी.पाटीलसाहेब - अध्यक्ष, रायगड जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था महासंघ रायगड-अलिबाग



सोहळ्याच्या दिवशी सत्कर्मश्रध्दाय या संस्थेस कृतज्ञता निधी समर्पण



सोहळ्याच्या दिवशी वनवासी कल्याण आश्रम या संस्थेस कृतज्ञता निधी समर्पण



सोहळ्याच्या दिवशी केतन करूणेश्वर वृध्दाश्रम या संस्थेस कृतज्ञता निधी समर्पण



संस्थेतर्फे आयोजित केलेल्या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते मा.श्री.पार्थजी बावस्कर यांचे संस्थेतर्फे स्वागत करताना मा.अध्यक्ष श्री.अमित ओझे



वर्धापनदिनानिमित्त उपस्थित प्रमुख पाहुणे मा.ॲड.जे.टी.पाटील उपस्थितांना मार्गदर्शन करताना



संस्थेतर्फे श्री. पार्थ बावस्कर यांचे ''वन्दे मातरम्''
या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानातील क्षण



वर्धापनदिनानिमित्त संस्थेच्या अध्यक्षांना शुभेच्छा व पुष्पगुच्छ
देताना संस्थेचे सभासद व हितचिंतक



संस्थेच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित
संस्थेचे सभासद व हितचिंतक



२५ व्या सेवापूर्तीनिमित्त संस्थेचे वरिष्ठ व्यवस्थापक व
कर्जवसुली विभाग प्रमुख श्री.महेंद्र गोडबोले यांचा
संस्थेतर्फ सत्कार करताना मा.अध्यक्ष व संचालक मंडळ


**केशवस्मृति**

**नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

१०२, १०३, आदित्य विहार को-ऑप. हौ. सोसायटी,
महात्मा फुले रोड, पनवेल. फोन : ८६५७००१८४१


प्रति, ..........................................................

..........................................................

..........................................................

printom269@gmail.com / Mob. 8805877900